राास्त भाव /शिधावाटप दुकान मंजूर करणे संबंधात सुधारीत आदेश..

महाराष्ट्र शासन
अन्न व नागरी पुरवठा विभाग
शासन निर्णय क्रमांक : साविव्य १०९१/२४२४/पृ. ६१७८/ना.पु. २८
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १२ नोव्हेंबर, १९९१.

शासन निर्णय :-

रास्त भाव/शिधावाटप दुकान/दुकाने मंजूर करणेसंबंधात शासन परिपत्रक क्रमांक पीडीएस १०८०/२४५५/पीडीएस दिनांक २३/१२/१९८० अन्वये अग्रक्रम सूची विहित करण्यात आलेली आहे. तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत रास्त भाव/शिधावाटप दुकाने मंजूर करणे आणि त्याचे दैनंदिन व्यवस्थापन करणे या संबंधात मागील ३४ वर्षात शासनाने अनेक आदेश निर्गमित केलेत. त्यातील काही आदेश कालांतराने रद्द करण्यात आलेत व काहीत सुधारणा करण्यात आल्या.

सार्वजनिक वितरण व्यवस्था परिणामकारकरित्या समाजातील गरीबातल्या गरीब माणसापावेतो नेण्याचे दृष्टीने रास्त भाव/शिधावाटप दुकाने मंजूर करणे आणि त्याचे व्यवस्थापण करणे या संबंधात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाचे पुनर्विलोकन करून त्यात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाचे विचाराधीन होता. या दृष्टीने विचार करून रास्त भाव/शिधावाटप दुकाने मंजूर करणेसंबंधातील अग्रक्रम सूची आणि इतर संलग्न बाबींसंबंधात यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व आदेश रद्द करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

रास्त भाव/शिधावाटप दुकाने मंजूर करणे आणि त्याचे व्यवस्थापन व नियंत्रण करणे या संबंधातील सुधारित आदेश खालीलप्रमाणे असतील :-

१] रास्त भाव/शिधावाटप दुकान मंजूर करण्याकरिता प्राधान्य सूची

अ] एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत समाविष्ट क्षेत्र

१] ज्या गावाकरिता किंवा गाव समूहाकरिता रास्त भाव दुकान मंजूर करावयाचे आहे त्या गावात किंवा गाव समुहातील कोणत्याही एका गावात कायमस्वरूपी निवास असलेली आदिवासी व्यक्ती.

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.
20 NOV 1991
शाखा- पुरवठा/२११७

....२/-

यात सुशिक्षीत आदिवासी स्त्रीस सर्वात वरचे स्थान व त्यानंतर दुसऱ्या क्रमांकाचे स्थान सुशिक्षीत बेकार आदिवासी व्यक्तीस देण्यात यावे.

[३] ग्राम पातळीवरील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था

४] आदिवासी स्त्रियांची ग्राहक सहकारी संस्था

५] इतर ग्राहक सहकारी संस्था

[ब] इतर क्षेत्र

[१] स्त्रीयांची ग्राहक सहकारी संस्था

२] इतर ग्राहक सहकारी संस्था

३] ग्राम पातळीवरील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था

४] अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती मधील व्यक्ती.

५] स्वातंत्र्य संग्राम सैनिक

६] माजी सैनिक [यात सैनिक कारवाईत मृत सैनिकाची विधवा पत्नी, त्यांचा मुलगा, अगर लग्न न झालेली मुलगी यांचा समावेश आहे.]

७] अपंग व्यक्ती

८] प्रकल्प ग्रस्त व्यक्ति

९] इतर

ब[४] ते ब[९] मधील व्यक्तींचा त्यांचे प्राधान्य क्रमानुसार विचार करताना स्त्री अर्जदारास सर्वात वरचे स्थान देण्यात यावे व त्यानंतर सुशिक्षीत बेकार व्यक्तीस दुसऱ्या क्रमांकाचे स्थान देण्यात यावे. उदा. अपंग व्यक्तींचा विचार करताना अपंग स्त्रिस त्या गटात [म्हणजेच गट क्रमांक ७] सर्वात वरचे स्थान देण्यात यावे व त्यानंतर दुसऱ्या क्रमांकाचे स्थान अपंग सुशिक्षीत बेकार व्यक्तीस देण्यात यावे. परंतु अपंग स्त्री व्यक्तीस माजी सैनिकापेक्षा वरचे स्थान मिळणार नाही.

तथापि वरील [अ] आणि [ब] परिच्छेदात नमूद केलेल्या प्राधान्य सूचिचा विचार न करता राज्य शासन किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी महाराष्ट्र महिला आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य

सहकारी मार्केटिंग फेडरेशन, महाराष्ट्र राज्य ग्राहक सहकारी फेडरेशन, विदर्भ को. ऑप. मार्केटिंग सोसायटी, महाराष्ट्र आदिवासी विकास महामंडळ [फक्त आदिवासी भागाकरिता] या राज्य/विभाग स्तरिय सहकारी किंवा शासन अंगिकृत संस्थाना तसेच मुंबई शिधावाटप क्षेत्रात दुकानांची साखळी असलेल्या सुपर बाजार, अपना बाजार या संस्थाना रास्त भाव/शिधावाटप दुकाने मंजूर करु शकेल. तसेच एखाद्या उद्योगात/उद्योग समूहात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता त्या कर्मचाऱ्यांनी गठित केलेल्या ग्राहक सहकारी संस्थेस अगर त्या उद्योगास रास्त भाव/शिधावाटप दुकान मंजूर करावयाचे असेल तर वरील अग्रक्रम सूचीचा विचार केला जाणार नाही. एखाद्या भागातील रहिवाश्यांनी त्यांचे स्वत:चे उपयोगाकरिता ग्राहक सहकारी संस्था तयार केल्यास आणि त्यांचेकडे दुकान चालविण्याकरिता पुरेशी जागा उपलब्ध असल्यास त्या ग्राहक सहकारी संस्थेस सर्वात वरचा अग्रक्रम देण्यात यावा. तसेच दुकानदाराचे मृत्यूमुळे वाटपाकरिता उपलब्ध झालेले रास्त भाव दुकान देताना त्याचे स्वत:चे मुलास अगर पत्नीस प्रथम अग्रक्रम देण्यात यावा. परंतु अशा प्रकारे अग्रक्रम देताना मयत व्यक्तिच्या मुलाची अगर पत्नीची दुकान चालविण्याची क्षमता व पात्रता या बाबींचाही विचार करण्यातयावा.

[२] रास्त भाव/शिधावाटप दुकान मंजूर करण्याची पध्दती.

[अ] जाहिरनामा प्रसिध्द करणे :

पाच हजार किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावात रास्त भाव/शिधावाटप दुकान मंजूर करावयाचे असल्यास त्याबाबतचा जाहिरनामा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावा. तसेच असा जाहिरनामा त्या गावचे ग्रामपंचायतचे तसेच चावडीवरील नोटीस फलकावर लावून आणि त्या गावात दवंडी देवून प्रसिध्द करण्यात यावा. अशा प्रकारे जाहिरनामा प्रसिध्द केल्याबाबत त्या गावचे दक्षता समितीचा अहवाल मागविण्यात यावा.

पाच हजारापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावात रास्त भाव दुकान मंजूर करावयाचे असल्यास त्याबाबतचा जाहिरनामा त्या गावचे ग्रामपंचायतीचे आणि चावडीचे नोटीस फलकावर प्रसिध्द करण्यात यावा. तसेच जाहिरनामा संबंधित गावात दवंडी देवून सुध्दा प्रसिध्द करण्यात यावा. जाहिरनामा वरील पध्दतीनुसार योग्य प्रकारे प्रसिध्द करण्यात आला याची खात्री करण्याचे दृष्टीने त्या गावचे दक्षता समितीचा अहवाल मागविण्यात यावा. पाच हजारापेक्षा कमी लोकसंख्येच्या गावाकरिता रास्त भाव दुकान मंजूर करण्याकरिता जाहिरनामा वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याची आवश्यकता नाही.

...४/-

तथापि, राज्य शासनाने किंवा राज्य शासन प्राधिकृत अधिका-याने रास्त भाव/शिधावाटप दुकान अगर दुकाने महिला आर्थिक विकास महामंडळ, मार्केटिंग फेडरेशन, कंझ्युमर फेडरेशन, विदर्भ को. ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटी, महाराष्ट्र आदिवासी विकास महामंडळ [फक्त आदिवासी क्षेत्राकरिता] या राज्य/विभाग स्तरिय सहकारी संस्थांना किंवा मुंबई शिधावाटप क्षेत्रातील अपना बाजार, सुपर बाजार यांना मंजूर करण्याचे ठरविल्यास त्याबाबतचा जाहिरनामा वरील पध्दतिने प्रसिध्द करण्याची आवश्यकता राहणार नाही.

तसेच एखाधा उधोग-उधोग समूहात/व्यवस्थापणात/उपक्रमांत काम करणा-या कर्मचा-यांकरिता त्या कर्मचा-यांनी गठित केलेल्या ग्राहक सहकारी संस्थेस अगर त्या उधोग समुहास/व्यवस्थापणास रास्त भाव/शिधावाटप दुकान मंजूर करावयाचे झाल्यास वरील पध्दतीनुसार जाहीरनामा प्रसिध्द करण्याची आवश्यकता असणार नाही.

[ब]. २[अ] मध्ये नमूद केलेल्या पध्दतीनुसार जाहीरनामा प्रसिध्द केल्यानंतर इच्छुक व्यक्तींना/संस्थाना अर्ज करण्याकरिता पूर्ण १५ दिवसांची मुदत देण्यात यावी. [ज्या दिवशी जाहिरनामा प्रसिध्द झाला तो दिवस सोडून] जाहिरनामा प्रसिध्द होण्यापूर्वी प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येवू नये. तसेच १५ दिवसांची निर्धारित मुदत संपल्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा सुध्दा विचार करण्यात येवू नये.

[क] विहित नमुन्यात प्राप्त झालेला अर्जाचाच विचार करण्यात यावा.

[ड] परिच्छेद १[अ] आणि १][ब] मधील प्राधान्य सूची मधील अग्रक्रमानुसार पात्र व्यक्तीस अगर संस्थेस रास्त भाव/शिधावाटप दुकान मंजूर करण्यात यावे.

[इ] अग्रक्रम सूचित सारख्याच प्राथम्याचे आणि सारख्याच पात्रतेचे एका पेक्षा अधिक अर्ज असल्यास ईश्वर चिठ्ठीने अर्जदाराची निवड करण्यात यावी व त्यास रास्त भाव/शिधावाटप दुकान मंजूर करण्यात यावे. ईश्वर चिठ्ठी काढण्याचे काम तालुका पातळीवरील /शिधावाटप क्षेत्राचे दक्षता समितीचे कमीत कमी तीन सदस्यांचे समक्ष करण्यात यावे.

[ई] तथापि राज्य शासनाने किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याने रास्त भाव/शिधावाटप दुकान महिला आर्थिक विकास महामंडळ मार्केटिंग फेडरेशन, कंझ्युमर फेडरेशन, विदर्भ को. ऑपरेटिव्ह मार्केटिंग संस्था, महाराष्ट्र आदिवासी विकास महामंडळ [फक्त आदिवासी क्षेत्राकरिता ] या राज्य स्तरीय/विभाग स्तरीय सहकारी संस्थाना किंवा मुंबई शिधावाटप

क्षेत्रात सुपर मार्केट, अपना बाजार या संस्थाना मंजूर करावयाचे ठरविल्यास परिच्छेद २[ब], २[क] २[ड] आणि २[इ] मधील पध्दतीचा अवलंब करण्याची गरज असणार नाही.

[३] मंजूर करावयाची रास्त भाव/शिधावाटप, दुकानांची जास्तीत जास्त संख्या.

परिच्छेद १ मधील अग्रक्रम सूचीतील कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस एकापेक्षा अधिक रास्त भाव/शिधावाटप दुकाने मंजूर करता येणार नाहीं.

व्यक्ती या संज्ञेत त्याचि.कुटूंबातील सर्व सदस्यांचा समावेश आहे. कुटूंब म्हणजे पत्नी, मुलगा, लग्न न झालेली मुलगी, आई आणि वडील.

तथापि या आदेशापूर्वीच ज्या व्यक्तिस अगर संस्थेस एकापेक्षा अधिक रास्त भाव/शिधावाटप दुकाने मंजूर करण्यात आली असतील त्यात बदल करण्यात येवू नये.

तसेच महिला आर्थिक विकास महामंडळ, मार्केटिंग फेडरेशन, कंझ्युमर फेडरेशन, विदर्भ को. ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटी, महाराष्ट्र आदिवासी विकास महामंडळ, [फक्त आदिवासी भागाकरिता] या राज्य/विभाग स्तरीय सहकारी संस्थांना तसेच मुंबई शिधावाटप क्षेत्रात सुपर मार्केट, अपना बाजार यांना एकापेक्षा अधिक रास्त भाव/शिधावाटप दुकान मंजूर करता येवू शकतील.

[४] नोकरनामा आणि तत्सम प्रकारच्या प्राधिकार पत्रावर बंदी

रास्त भाव/शिधावाटप दुकान मंजूर करण्यात आलेल्या व्यक्तीस स्वत: दुकान चालवावे लागेल. दुकान चालविण्याकरिता तसेच गोदामातून शिधावस्तू उचलण्याकरिता आणि रास्त भाव/शिधावाटप दुकानासंबंधी कोणत्याही प्रकारचे आर्थिक व्यवहार करण्याकरिता इतर कोणासही नोकरनामा किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे प्राधिकारपत्र देता येणार नाही. तसेच मंजूर झालेले दुकाने कोणत्याही परिस्थितीत कोणासही हस्तांतरीत करता येणार नाही.

तथापि सहकारी संस्था आणि इतर संस्थांना मंजूर करण्यात आलेली रास्त भाव/शिधावाटप दुकान/दुकाने मात्र त्या संस्थेच्या कर्मचाऱ्यांमार्फत चालविता येवू शकतील.

तथापि एखादा रास्त भाव/शिधावाटप दुकानदार आजारपण किंवा इतर काही अपरिहार्य कारणामुळे काही कालावधीकरिता स्वत: दुकान चालवू शकत नसेल तर संबंधित जिल्हाधिकारी/नियंत्रक शिधावाटप किंवा उप विभागीय अधिकारी जास्तीत जास्त तीन महिन्यापावेतो असे रास्त भाव दुकान नोकर किंवा इतर व्यक्तीमार्फत चालविण्याची परवानगी देवू शकतील.

यापेक्षा जास्त कालावधीकरता रास्त भाव /शिधावाटप दुकानदार त्यास मंजूर करण्यात आलेले दुकान चालवू शकत नसेल तर मात्र त्यास दुकानाचा राजीनामा द्यावा लागेल.

रास्त भाव/शिधावाटप दुकान मंजूर झालेल्या व्यक्तीचे मृत्यूनंतर त्यास मंजूर करण्यात आलेले दुकान आपोआप रद्द होईल.

[५] रास्त भाव/शिधावाटप दुकानास जोडावयाच्या एकांकांची संख्या

रास्तभाव/शिधावाटप दुकानास जोडावयाचे एकांकाची जास्तीत जास्त संख्या खालील राहील :-

[अ] मुंबई ठाणे शिधावाटप क्षेत्र :-

| | | |
|---|---|---|
| सहकारी संस्थेमार्फत चालविले जाणारे दुकान | - | १०,००० एकांके |
| व्यक्तीमार्फत चालविले जाणारे दुकान | - | ८,००० एकांके |

[ब] इतर नागरी क्षेत्र :-

| | | |
|---|---|---|
| सहकारी संस्थेमार्फत चालविले जाणारे दुकान | - | ८,००० एकांके |
| व्यक्तीमार्फत चालविले जाणारे दुकान | - | ६,००० एकांके |

[क] ग्रामिण क्षेत्र :-

| | |
|---|---|
| सहकारी संस्था तसेच | ४,००० एकांके किंवा |
| व्यक्तीमार्फत चालविले जाणारे दुकान | २,००० लोकसंख्या |

[ड] आदिवासी आणि विशेष कृति कार्यक्रमात समाविष्ट इतर क्षेत्र

आदिवासी आणि विशेष कृति कार्यक्रमात समाविष्ट क्षेत्राकरिता इतर ग्रामिण क्षेत्रातील रास्त भाव दुकानाप्रमाणेच एकांकाची मर्यादा असावी. तथापि डोंगराळ आणि दुर्गम क्षेत्राकरिता ५०० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या प्रत्येक महसूली गावाकरिता एक स्वतंत्र रास्त भाव दुकान मंजूर करण्यास हरकत नाही. परंतु अशा प्रकारच्या गावात एक रास्त भाव दुकान पूर्वीच कार्यरत असेल तर त्या ठिकाणी दोन हजार लोकसंख्येपर्यंत पुन्हा नविन दुकान मंजूर करण्याची गरज नाही.

रास्त भाव/शिधावाटप दुकानास जोडावयाच्या एकांकाची वरील मर्यादा महिला आर्थिक विकास महामंडळ, मार्केटिंग फेडरेशन, कंझ्युमर फेडरेशन विदर्भ को. ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटी, अपना बाजार, आणि सुपर बाजार, यांना मंजूर करण्यात आलेल्या दुकानांना लागू होणार नाही.

[६] शिधावाटप /रास्त भाव दुकान मंजूर करण्याकरिता सक्षम अधिकारी

[अ] मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र : नियंत्रक शिधावाटप मुंबई किंवा त्यांनी आदेशाद्वारे प्राधिकृत केलेला वर्ग १ श्रेणीतील इतर कोणताही अधिकारी

[ब] इतर क्षेत्र : जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी किंवा त्यांनी आदेशाद्वारे प्राधिकृत केलेला वर्ग १ श्रेणीतील इतर कोणताही अधिकारी

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

[७] रास्त भाव /शिधावाटप दुकानाविरुध्द कारवाई करणे तसेच नवीन दुकान मंजूर करणे याकरिता कालबध्द कार्यक्रम

| | |
|---|---|
| अ] तपासणी केल्यानंतर दुकान निलंबित करणे [आवश्यकता असल्यास] | एक आठवडा |
| ब] दुकानाविरुध्दची सविस्तरचौकशी पूर्ण करणे | ४ आठवडे |
| क] चौकशी पूर्ण केल्यानंतर आवश्यकता भासल्यास दुकान रद्द करणे | २ आठवडे |
| ड] नविन दुकान मंजूर करणेकरिता जाहिरनामा काढणे व प्रसिध्द करणे [स्थगनादेश नसल्यास] | २ आठवडे |
| इ] नविन दुकानाकरिता अर्ज मागविणे | २ आठवडे |
| [ई]नविन दुकानाकरिता प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करणे व चौकशी करणे | २ आठवडे |
| क] नविन दुकान मंजूर करणे | १ आठवडा |

[८] रास्तभाव/स्वस्त धान्य दुकानांच्या तपासण्या व त्यांच्या पुनर्विलोकनाच्या संबंधिची प्रमापके :-

रास्तभाव/स्वस्तधान्य दुकानाच्या तपासण्या विविध अधिका-यांनी खालील प्रमापकानुसार कराव्यात :-

१] जिल्हा पुरवठा अधिकारी ---- किमान दोन रास्त भाव दुकानांच्या स्वतंत्रपणे तपासण्या

व

त्यांच्या हाताखालील कर्मचारी

कृ.मा.प.

| | |
|---|---|
| | वर्गांनी त्या दुकानांच्या तपासण्या केल्या असतील अशा किमान चार दुकानांच्या तपासण्या |
| २] उपविभागीय अधिकारी — | किमान दोन रास्त भाव दुकानाच्या स्वतंत्रपणे तपासण्या<br>व<br>तहसिलदार व पुरवठा निरीक्षक अधिकारी यांनी तपासणी केलेल्या किमान २ दुकानांच्या तपासण्या |
| ३] तहसिलदार — | किमान चार रास्त भाव दुकानांच्या स्वतंत्रपणे तपासण्या<br>व<br>पुरवठा निरीक्षक अधिकारी/पुरवठा निरीक्षक यांनी तपासणी केलेल्या किमान ५ दुकानांच्या तपासण्या |
| ४] पुरवठा निरिक्षक अधिकारी/पुरवठा निरीक्षक — | किमान १० रास्तभाव दुकानांच्या तपासण्या |

महाराष्ट्र अनुसुचित वस्तू [ वितरणाचे विनियमन], आदेश १९७५ च्या खंड २२ अन्वये रास्त भाव दुकानांची तपासणी करण्याचे अधिकार जिल्हयातील कनिष्ठ अधिकारी वर्गाकडे प्रदान करण्यास जिल्हाधिकारी सक्षम आहेत. शासनाने असा निर्णय घेतला आहे की, हे अधिकार जिल्हयातील संबंधित नायब तहसिलदारांनाही देण्यात यावेत. जिल्हाधिका-यांनी नायब तहसिलदारांना अधिकार प्रदानाबाबत कार्यवाही करावी. त्यानुसार नायब तहसिलदारांनी करावयाच्या तपासण्यांची प्रमाणके तहसिलदारांप्रमाणेच राहतील.

शासनाने असाही निर्णय घेतला आहे की, प्रत्येक तालुक्यातील सर्व रास्तभाव दुकानांची तपासणी ६ महिन्यातून किमान एकदा तरी व्हावी व रास्तभाव दुकानांच्या तपासण्यांचा कार्यक्रम आखतांना प्रत्येक रास्तभाव दुकानांची तपासणी ६ महिन्यातून किमान एकदा तरी होईल अशा रितीने तो कार्यक्रम आखावा.

मुंबई शिधावाटप क्षेत्रासाठी अधिकृत शिधावाटप दुकानांच्या तपासण्यांची प्रमाणके नियंत्रक शिधावाटप यांनी ठरवून दिलेली आहेत. त्यानुसार अधिकृत शिधावाटप दुकानाची तपासणी करण्यात याव्यात.

[९] रास्तभाव/अधिकृत दुकानांच्या आकस्मिक तपासण्या

क्षेत्रिय अधिका-यांनी करावयाच्या तपासण्या व पुनर्विलोकन

यापैकी काही तपासण्या खाली नमुद केल्याप्रमाणे आकस्मिक तपासण्या म्हणून करण्यात याव्यात.

| | | |
|---|---|---|
| १] जिल्हा पुरवठा अधिकारी | - | एक रास्तभाव दुकानाची स्वतंत्रपणे आकस्मिक तपासणी |
| २] उपविभागीय अधिकारी | - | एक रास्त भाव दुकानाची स्वतंत्रपणे आकस्मिक तपासणी |
| ३] तहसिलदार | — | दोन रास्त भाव दुकानांच्या स्वतंत्रपणे आकस्मिक तपासण्या |
| ४] नायब तहसिलदार | — | दोन रास्तभाव दुकानांच्या स्वतंत्रपणे आकस्मिक तपासण्या |
| ५] पुरवठा निरिक्षक अधिकारी/पुरवठा निरिक्षक | — | दोन रास्तभाव दुकानांच्या स्वतंत्रपणे आकस्मिक तपासण्या |

१०] मुंबई शिधावाटप क्षेत्रासाठी अधिकृत शिधावाटप दुकानांच्या तपासण्यांची प्रमाणके नियंत्रक शिधावाटप यांनी ठरवून दिलेली आहेत. त्यानुसार ज्या अधिका-यानी महिन्यातून फक्त एकाच दुकानाची तपासणी करावयाची आहे ती आकस्मिक स्वरुपाची असावी. ज्या अधिका-यांनी महिन्यातून २ दुकानांच्या तपासण्यात करावयाच्या आहेत त्यांनी किमान एका दुकानाची आकस्मिक तपासणी करावी. इतर क्षेत्रिय अधिका-यांनी दरमहा/आकस्मिक तपासण्या कराव्यात.

| | | अधिकृत शिधावाटप दुकानांची आकस्मिक तपासणी प्रति महिना |
|---|---|---|
| १. सहाय्यक नियंत्रक शिधावाटप [ फिरते पथक ] प्रधान कार्यालय | — | १ |
| २. सहाय्यक नियंत्रक शिधावाटप[ फिरते पथक ]परिमंडळ कार्यालय | — | १ |
| ३. मुख्य निरीक्षण अधिकारी [ फिरते पथक ] प्रधान कार्यालय | — | १ |
| ४. मुख्य निरीक्षण अधिकारी [ फिरते पथक ]परिमंडळ कार्यालय | — | १ |
| ५. सहाय्यक शिधावाटप अधिकारी[ तपासणी ]फिरते पथक | — | १ |
| ६. शिधावाटप निरीक्षक[ फिरते पथक ]प्रधान कार्यालय | — | १ |
| ७. शिधावाटप निरीक्षक [ फिरते पथक ]परिमंडळ कार्यालय | — | १ |

[११] अधिकृत शिधावाटप/रास्तभाव दुकानांच्या गैरव्यवहाराविरुध्द करण्यात येणा-या कार्यवाहीच्या कामी सुसूत्रता आणणे

अधिकृत शिधावाटप/रास्तभाव दुकानात आढळून येणारे दोष

सर्वसाधारणपणे खालील ३ वर्गात मोडतात :-

दोषांचे प्रकार

अ] किरकोळ स्वरूपाचे दोष

ब] मध्यम स्वरूपाचे दोष

क] गंभीर स्वरूपाचे दोष

वरील पैकी प्रत्येक वर्गात सामान्यत: कोणते दोष मोडू शकतात ते खाली नमूद केले आहे. त्या दोषांच्या संदर्भात संबंधीत अधिकृत शिधावाटप/रास्त भाव दुकानदारांविरुध्द कोणती दंडनीय कारवाई करण्यात यावी याबद्दलची मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहेत :-

अ] किरकोळ स्वरूपाचे दोष :-

किरकोळ दोष

१] स्वस्त धान्य दुकानदारांनी पहिल्या व शेवटच्या पावतीवर सही न करणे

२] धान्य दुकानाचा क्रमांक/दुकानातून वितरीत करण्यात येणारे अन्नधान्य व दुकानांची वेळ दर्शविणारा फलक दुकानात नसणे.

३] दुकानाला शासनाकडून देण्यात आलेले प्राधिकारपत्र दुकानात नसणे.

४] धान्याचे नमुने, दराच्या चिठ्ठ्या न लावणे, धान्य पारदर्शक बाटल्यात न ठेवणे.

५] कांही पावत्यांवर ग्राहकांच्या सह्या किंवा अंगठे न घेणे

करावयाची दंडनीय कारवाई :-

कारवाई

वरील पैकी एक किंवा अनेक दोष आढळल्यास खालील प्रकारची कारवाई करण्यात यावी :-

१] ताकीद देणे

२] ५० टक्के पर्यन्त अनामत रक्कम सरकार जमा करणे

ब] मध्यम स्वरूपाचे दोष

मध्यम दोष

१] दिलेल्या पावत्या टाकणे, विक्री रजिस्टरमध्ये नोंद न घेणे.

२] परवान्यावर उचलेला माल त्याच दिवशी स्टॉक रजिस्टरवर न नोंदणे.

३] कार्डधारकांच्या शिधापत्रिकेवर मालाची नोंद न घेणे.

४] कार्डधारकांना दिलेल्या शिधापत्रिकेवर दर्शविलेला माल मिळत नाही अशी तक्रार नोंदविणे.

....११/-

५] पुस्तकी शिल्लक व प्रत्यक्ष साठे यांत तफावत असणे.

६] सातत्याने ग्राहकांच्या सह्या, आंगठे पावत्यांवर न घेणे. ✓

७] स्वस्त धान्य दुकान वेळेवर न उघडणे किंवा बंद ठेवणे.

करावयाची दंडनीय कारवाई

वरील पैकी एक किंवा अनेक दोष आढळल्यास अनामत रक्कम संपूर्णपणे सरकारजमा करण्याची कारवाई करण्यात यावी.

करावयाची दंडनीय कारवाई

क] गंभीर स्वरूपाचे दोष

१] अन्नधान्य व इतर वस्तू शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त दराने विकणे, वेगवेगळ्या प्रकारचे हिशेब एकमेकांशी न जुळणे.

गंभीर स्वरूप दोष

२] महाराष्ट्र फूडग्रेन रेशनिंग [सेकंड] आॅर्डर, १९६६ व महाराष्ट्र अनुसूचित वस्तू [वितरणाचे विनियमन] आदेश १९७५ अन्वये विहित केलेली वेगवेगळी रजिस्टर्स न ठेवणे.

३] १९६६ व १९७५ या आदेशातील विविध तरतुदींचे अनुपालन न करणे

४] मालाचा गैरव्यवहार व दुकानात माल न आणणे किंवा उचलेला माल रास्त भाव दुकानांत न आणता त्याची अन्यत्र विक्री करणे.

५] अधिकृत वजन मापे न वापरणे

६] माल न उचलणे व दुकान बंद ठेवणे.

करावयाची दंडनीय कारवाई

वर नमूद केलेल्या गंभीर स्वरूपाचे एक किंवा अनेक दोष आढळल्यास संपूर्ण अनामत रक्कम जप्त करण्यात यावी व दुकानाचा परवाना रद्द करण्यात यावा. तसेच शिधावस्तूंचा ~~काळाबाजार~~ काळाबाजार मालाची अफरातफर इत्यादि दोष आढळून आल्यास जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ च्या कलम ३ व ७ अन्वये संबंधित दुकानदारांविरुध्द खटले दाखल करण्यांत यावेत.

दंडनीय कारवाई

२. विविध प्रकारच्या दोषांकरिता वर जी दंडनीय कारवाई सुचविण्यात आली आहे, ती केवळ "मार्गदर्शक तत्वे " म्हणून सुचविण्यात आली आहे. प्रत्येक प्रकरणांतील दोषाचे स्वरूप लक्षात घेऊन संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्येक प्रकरणात गुणवत्तेनुसार स्वविचाराने दंडनीय कारवाई करावी.

३. शासनाच्या असेही निदर्शनास आले आहे की, अनेक प्रकरणांत चौकशी अधिकारी सुनावणीनंतर जे निर्णय घेतात त्यात विविध प्रकारच्या त्रुटी राहून जातात. प्रकरण फेरतपासणीत घेतले जाते अथवा न्यायालयात नेले जाते, तेंव्हा या त्रुटीचा फायदा दुकानदारांकडून घेतला जातो व फेरतपासणीत न्यायालयात निर्णय शासनाच्या विरुध्द जातात. असे होऊ नये म्हणून मुळातच निकालपत्रात कोणत्याही प्रकारच्या त्रुटी राहू नयेत याबाबत खबरदारी घेणे आवश्यक आहे.

या संबंधात चौकशी अधिका-यांनी विशेषत: खालील बाबींची दक्षता घ्यावी :-

[अ] पुर्नरिक्षण अर्जात व न्यायालयातून जे निकाल शासनाच्या विरुध्द गेलेले आहेत, ते कोणत्या कारणांमुळे विरुध्द गेले हे लक्षात घेण्यात यावे व ती कारणे अथवा तशा कायदेशीर त्रुटी निकाल देताना शिल्लक राहाणार नाही, याची काळजी घेण्यात यावी.

[ब] अधिकृत शिधावाटप/रास्त भाव दुकानदाराला आपले म्हणणे मांडण्याची योग्य व पुरेशी संधी देण्यात यावी.

[क] उपलब्ध पुराव्याची योग्य ती छाननी करावी. तसेच साक्षीदारांची शक्य तो सत्यप्रतिज्ञेवर तपासणी करुन लेखी जबाब नोंदवून घेण्यात यावे.

[ड] रास्त भाव दुकानदारांविरुध्द करावयाच्या दंडनिय कारवाई बाबतचे आदेश बोलके [ Speaking Order ] व स्वयंस्पष्ट असावे. तसेच त्या आदेशात दंडनीय कारवाईबाबतची कारणमिमांसा नमूद करण्यांत यावी.

४. शासनाच्या असेही निदर्शनास आले आहे की, एकाच प्रकारच्या गुन्ह्याकरता एकाच अधिका-यांकडून वेगवेगळ्या प्रकरणांत वेगवेगळ्या प्रकारची दंडनीय कारवाई केली जाते. हे केंव्हाही समर्थनीय ठरु शकत नाही . अशी बाब निदर्शनास आल्यास त्याची यापुढे गंभीर दखल घेतली जाईल.

५. अधिकृत शिधावाटप/रास्त भाव दुकानदारांच्या गैरव्यवहाराविरुध्द करावयाच्या कारवाईच्या संदर्भात सक्षम अधिका-यांनी विचारात घेण्यासाठी वर जी मार्गदर्शक तत्वे सुचविण्यात आली आहेत ती मार्गदर्शक तत्वे अथवा या परिपत्रकातील अन्य सूचनांचा सक्षम अधिका-यांनी निर्णय घेताना योग्य तो विचार करावा. तथापि त्यांनी निर्गमित केलेल्या आदेशांमध्ये या परिपत्रकाचा कोणताही उल्लेख करु नये.

## १२] रास्त भाव/अधिकृत शिधावाटप दुकाने नियमितपणे वेळेवर उघडणे

रास्त भाव/अधिकृत शिधावाटप दुकानदाराने शासनाने ठरवून दिलेल्या वेळी दुकाने उघडणे व ती निश्चित वेळापत्रकानुसार चालू ठेवणे

नियमानुसार आवश्यक आहे. रास्तभाव/अधिकृत शिधावाटप दुकानदार संबंधित दुकानदारांकडून नियमितपणे वेळेवर उघडली जातात व निश्चित वेळा पत्रकानुसार सुरु ठेवली जातात की नाही हे पहाण्यासाठी दक्षता घेण्याच्या सूचना संबंधित अधिकारी व कर्मचारी वर्गास द्याव्यात. जे रास्त भाव/अधिकृत शिधावाटप दुकानदार याबाबत कुचराई करतील त्यांच्या विरुध्द नियमानुसार दंडनिय कारवाई करण्यात यावी.

१३. वर नमूद केलेल्या बाबींसंबंधात शासनाने यापूर्वी निर्गमित केलेले सर्व आदेश रद्द समजण्यात यावे. परंतु ज्या बाबींचा या आदेशात उल्लेख नाही अशा बाबींसंबंधात यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले आदेश मात्र यापुढे ही चालू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

[ कृ. भि. भोगे ]

उप सचिव, महाराष्ट्र शासन

अन्न व नागरी पुरवठा विभाग.